# अवतार

जाणीवपूर्वक किंवा अजाणता, प्रत्येक सजीव प्राणी एका गोष्टीचा शोध घेत असतो. जीवनप्रवाहातील कनिष्ठ योनींमध्ये, तसेच कमी प्रगत मनुष्यप्राण्यांत हा शोध अजाणता होत असतो, तर प्रगत अशा मनुष्यजातींत तो जाणीवपूर्वक होत असतो. या शोधामागील उद्दिष्टाला अनेक नावे दिली गेली आहेत -- समाधान, शांती, स्वातंत्र्य, सत्य, प्रेम, पूर्णत्व, आत्म-साक्षात्कार, ईश्वर - साक्षात्कार, ईश्वराशी एकरूपता इ.इ. मूलतः हा शोध या सर्वांसाठी आहे, पण एका विशिष्ट पद्धतीने. प्रत्येकाला समाधानाचे क्षण अनुभवावयास मिळतात, सत्याची किंचित झलक पहावयास मिळते, ईश्वराशी एकरूप झाल्याचे निसटते अनुभव चाखावयास मिळतात; त्याची इच्छा असते ती या सर्वांना शाश्वत स्वरूप देण्याची. त्याची इच्छा असते ती सतत होणाऱ्या बदलात चिरंतन सत्याची स्थापना करण्याची.

ही एक नैसर्गिक इच्छा असून, ती व्यक्तीला तिच्या ईश्वराशी असलेल्या तात्त्विक ऐक्याची जी स्मृती असते – ही स्मृती व्यक्तीची उत्क्रांती कनिष्ठ स्तरावरील आहे की उच्च स्तरावरील, यानुसार अंधुक वा स्पष्ट असते – तिच्यावर मूलतः आधारलेली असते. कारण प्रत्येक सजीव प्राणी हा ईश्वराचा अंशतः झालेला आविष्कार असतो; फक्त तो स्वतःच्या सत्य स्वरूपाविषयीच्या अज्ञानामुळे बद्ध झालेला असतो. वास्तविक पाहता, ही सर्व उत्क्रांती नेणिवेतील ईश्वरत्वाकडून जाणिवेतील ईश्वरत्वाकडे होत जाणारा विकास आहे. असा विकास की ज्यामध्ये तत्त्वतः चिरंतन व अपरिवर्तनीय असलेला ईश्वर अनंत प्रकारचे आकार धारण करतो, अनंत प्रकारच्या अनुभवांचा उपभोग घेतो आणि अनंत प्रकारच्या स्व-निर्मित

मर्यादा उल्लंघून त्यांच्या पलीकडे जातो. विश्वकर्त्याच्या दृष्टीने पाहिल्यास, उत्क्रांती ही एक अशी दैवी लीला आहे की, जिच्या द्वारे अमर्याद ईश्वर सर्व प्रकारच्या मर्यादांमध्ये आपल्या असीम ज्ञानाची, शक्तीची व आनंदाची कसोटी पाहतो. परंतु सीमित ज्ञान, सीमित शक्ती व आनंद लुटण्याची मर्यादित कुवत असलेल्या प्राणिमात्राच्या दृष्टीने पाहता, उत्क्रांती म्हणजे एकाआड एक येणाऱ्या विश्रांती व श्रमसायास, सुख व दुःख, प्रेम व द्वेष यांसारख्या द्वंद्वांचे महाकाव्य असते. अखेरीस, पूर्णत्वाला पोहोचलेल्या मानवामध्ये सर्व द्वंद्वांचे संतुलन साधून ईश्वर द्वंद्वात्मक प्रकृतीच्या पार होईपर्यंत हे महाकाव्य चालू राहते.

त्यानंतर निर्मित [निर्माण केला गेलेला] व निर्माता [निर्माण करणारा] दोघेही आपण दोघे एक आहोत हे ओळखतात; अस्थिरतेमध्ये स्थिरता स्थापन केली जाते; [सापेक्ष] कालामध्ये [निरपेक्ष] चिरंतनत्व अनुभवास येते. ईश्वर स्वतःला ईश्वर म्हणून जाणतो – मूलतः अपरिवर्तनीय असलेला, अमर्याद आविष्कार प्रगट करणारा आणि अखंडपणे स्वतःच स्वतःबद्दलच्या नव्या जाणिवेत आत्म-साक्षात्काराचा सर्वश्रेष्ठ आनंद उपभोगत राहणारा ईश्वर म्हणून. अशा प्रकारचा साक्षात्कार जीवनामध्येच घडून आला पाहिजे व तसा तो घडून येतोही. कारण केवळ जीवनामध्येच बंधनाचा [मर्यादेचा] अनुभव घेऊन त्याच्या पलीकडे जाता येते, तसेच पुढे मिळणारा बंधनमुक्तीचा आनंद लुटणेही शक्य होते. हे बंधनमुक्तीचे स्वातंत्र्य तीन प्रकारचे असते.

बहुतेक ईश्वरसाक्षात्कारी आत्मे देहाचा तत्काळ त्याग करतात आणि ईश्वराच्या अप्रगट अंगामध्ये कायमचे विलीन होऊन राहतात. त्यांना केवळ ईश्वरी मीलनाच्या आनंदाची जाणीव असते. त्यांच्या दृष्टीने विश्वसृष्टीला अस्तित्व राहत नाही. जन्म-मरणांचे अखंड रहाटगाडगे त्यांच्यापुरते संपुष्टात येते. यालाच ***मोक्ष*** **(सामान्य मुक्ती), किंवा आत्म-स्वातंत्र्य असे समजले जाते.**

काही ईश्वर-साक्षात्कारी आत्मे काही काळ देह धारण करून राहतात, परंतु त्यांची जाणीव ईश्वराच्या अप्रगट अंगामध्ये पूर्णपणे विलीन झालेली असते. त्यामुळे त्यांना आपल्या देहाचे वा विश्वसृष्टीचे भान नसते. ते ईश्वराच्या अमर्याद आनंदाचा, शक्तीचा व ज्ञानाचा सतत अनुभव घेत असतात, परंतु या विश्वसृष्टीमध्ये त्यांचा जाणीवपूर्वक उपयोग ते करून घेऊ शकत नाहीत, किंवा इतरांना मुक्ती मिळविण्यात साहाय्यही करू शकत नाहीत. मात्र त्यांची या भूतलावरील निव्वळ उपस्थिती हीच

ईश्वराच्या अमर्याद शक्तीच्या, ज्ञानाच्या व आनंदाच्या एकीकरणाचा व प्रक्षेपणाचा केंद्र-बिंदू बनून राहते. त्यामुळे, जे कोणी त्यांच्याजवळ जातात, त्यांची सेवा करतात वा त्यांची पूजा करतात, त्यांना त्यांच्या संपर्कात आल्यामुळे आध्यात्मिक लाभ होतो. या शिवात्म्यांना ***मज्झुब-ए-कामिल*** असे म्हणतात, आणि या विशिष्ट प्रकारच्या मुक्तीला ***विदेह मुक्ती***, असे म्हटले जाते.

काही थोडे ईश्वर-साक्षात्कारी आत्मे असे असतात, की जे आपले देह राखून ठेवतात, आणि तरीही त्यांना ईश्वराच्या अप्रगट व प्रगट आशा दोन्ही अंगांतील ईश्वरत्वाची जाणीव असते. आपण न बदलणारे ईश्वरी तत्त्व [चैतन्य] आहोत, तसेच त्याचे अमर्याद विविध आविष्कार आहोत, या दोहोंचेही त्यांना [एकाच वेळी] ज्ञान असते. विश्वसृष्टीखेरीज आपण ईश्वरही आहोत असा त्यांना अनुभव येत असतो - - असा ईश्वर की जो अखिल विश्वसृष्टीचा निर्माता, पालनकर्ता व संहारकर्ता आहे, ज्याने विश्वसृष्टीच्या नियमांचा स्वीकार केलेला आहे आणि ते नियम उल्लंघून जो त्यांच्या पार झालेला आहे. त्यांना ईश्वराच्या परिपूर्ण शांतीचा, तसेच त्याच्या अमर्याद ज्ञान - शक्ती - आनंदाचा सतत अनुभव येत असतो. ते विश्वसृष्टी - निर्मितीच्या दैवी लीलेचा आनंद आकंठ उपभोगत असतात. प्रत्येकात वास करणारा ईश्वर आपण आहोत हे ते जाणत असतात. त्यामुळे प्रत्येकाला ते आध्यात्मिक दृष्ट्या मदत करू शकतात; तसेच इतर जीवात्म्यांना ते **विदेहमुक्त, मज्झुब** किंवा अगदी स्वतःप्रमाणे **सद्गुरू** स्वरूपातील ईश्वर-साक्षात्कारही प्राप्त करून देऊ शकतात.

सर्व काळी या जगामध्ये छप्पन्न ईश्वर-साक्षात्कारी आत्मे असतात. त्या सर्वांची जाणीव सदैव एकच असते. कार्याच्या दृष्टीने मात्र ते नेहमी भिन्न असतात. बहुतांशी ते सर्वसामान्य लोकांपासून दूर व अज्ञात राहून आपले जीवन कंठतात व कार्य करतात. परंतु त्यांच्यापैकी पाचजण, जे एका अर्थी नियामक मंडळासारखे कार्य करत असतात, ते समाजात मिसळून कार्य करतात व त्यांना सार्वजनिक प्रसिद्धी व महत्त्व प्राप्त होते. ते ***सद्गुरू*** किंवा पूर्णत्व पावलेले मानव - ईश्वर म्हणून ओळखले जातात. ***अवतारकालात, अवतार*** हा सर्वश्रेष्ठ सद्गुरू या नात्याने आध्यात्मिक नियामक-मंडळाच्या व अखिल आध्यात्मिक कारभारी मंडळाच्या प्रमुखपदाची आपली सूत्रे हाती घेतो.

***अवतारकाल*** हे विश्वसृष्टीतील वसंतऋतूच्या भरतीच्या लाटेसारखे होत. ते नव्या शक्तीचा आविष्कार, जाणिवेची नवी जागृती व जीवनाचा एक अनोखा अनुभव

यांना आपल्याबरोबर घेऊन येतात - केवळ मूठभर लोकांसाठी नाही, तर सर्वांसाठी. आध्यात्मिक शक्तीशी व जाणिवेशी संबंधित ज्या गुणांचा पूर्वी केवळ मोजक्या प्रगत साधकांनी वापर करून लाभ घेतलेला होता, ते गुण आता सर्व मानवजातीसाठी खुले केले जातात. सबंध जीवनच जाणिवेच्या उच्चतर स्तरापर्यंत उंचावले गेल्याने, त्याला चैतन्यशक्तीची नवी गती प्राप्ती होते. ऐंद्रिय ज्ञानापासून बौद्धिक ज्ञानापर्यंतचे स्थित्यंतर हा [आंतरविकासाचा] असा एक टप्पा होता; बौद्धिक ज्ञानापासून अंतःप्रेरणेपर्यंतचे स्थित्यंतर हा दुसरा टप्पा असेल.

सर्जनशील प्रेरणेचा हा जो नवा अंतःप्रवाह वाहू लागतो तो एका दैवी व्यक्तिमत्वाच्या माध्यमातून, म्हणजे विशेष अर्थाने ईश्वराच्या सगुण-साकार रूपातून – अवताराच्या माध्यमातून. हा अवतार म्हणजे उत्क्रांतीच्या प्रवाहातून **सद्गुरू** म्हणून बाहेर पडलेला सर्वात पहिला मानव होय. आजपर्यंत प्रगट झालेला व यापुढे प्रगट होत राहणारा तोच केवळ एक अवतार होय. त्याच्या द्वारे परमात्म्याने नेणिवेतील ईश्वरत्वापासून जाणिवेतील ईश्वरत्वापर्यंतचा प्रवास पूर्ण केला. तो करताना, जाणीवपूर्वक ईश्वर होण्यासाठी तो प्रारंभी नेणीवपूर्वक मानव बनला. त्याच्या द्वारे ईश्वर मानवजातीच्या मुक्तीसाठी अधूनमधून जाणीवपूर्वक मानव बनतो.

***अवतार*** हा निरनिराळी रूपे धारण करून, निरनिराळ्या नावांनी, निरनिराळ्या काळी, जगाच्या निरनिराळ्या भागांत प्रगट होतो. त्याचे आगमन हे नेहमी मानवजातीच्या आध्यात्मिक पुनर्जन्माशी जुळून होत असल्यामुळे, त्याच्या प्रगटीकरणापूर्वीचा सर्वात निकटचा काळ हा असा असतो की, ज्यात मानवजातीला आगामी पुनर्जन्माच्या यातना सहन कराव्या लागतात. मानव कधी नव्हे इतका आपल्या वासनांचा गुलाम बनतो, कधी नव्हे इतका लोभाविष्ट होतो, भीतिग्रस्त होतो व रागाच्या झपाट्यात वाहून जातो. सत्ताधारी दीनदुबळ्यांवर सत्ता गाजवतात, श्रीमंत वर्ग गरिबांचा छळ करतो; सत्तारूढ असलेल्या मूठभर लोकांच्या फायद्यासाठी बहुजनसमाजाचे शोषण केले जाते. सर्वसामान्य माणूस, शांतता किंवा स्वस्थता न मिळाल्यामुळे उत्तेजक द्रव्यात बुडून स्वतःला विसरण्याचा प्रयत्न करतो. अनैतिकता वाढीस लागते, गुन्हेगारी बोकाळते, धर्माची टर उडविली जाते. लाचलुचपत समाजाच्या सर्व थरांत पसरते. वर्गीय व राष्ट्रीय द्वेषभावना जागविल्या व पोसल्या जातात. युद्धांचा भडका उडतो. मानवजात अगतिक होऊन हताश बनते. विध्वंसाची लाट थोपवून धरली जाण्याची कोणतीही शक्यता दिसत नाही.

नेमक्या या काळी ***अवताराचे*** आगमन होते. ईश्वराचा मानवी रूपातील परिपूर्ण आविष्कार असल्यामुळे, अवतार हा अशा प्रकारचा मानदंड असतो की, ज्याच्या साहाय्याने मानव, आपण काय आहोत व काय होऊ शकू याचे मोजमाप घेऊ शकतो. दैवी स्वरूपातील मानवी जीवनाच्या द्वारे मानवी मूल्यांचा अर्थ स्पष्ट करून दाखवीत, तो त्या मूल्यांना यथार्थ दर्जा प्राप्त करून देतो.

त्याला प्रत्येक गोष्टीत स्वारस्य असते, परंतु चिंता मात्र कशाचीच नसते. एखाद्या क्षुल्लक दुर्घटनेबद्दल त्याला सहानुभूती वाटेल, तर सर्वात धक्कादायक अशी शोकांतिक घटनादेखील त्याला विचलित करू शकणार नाही. सुख-दुःख, इच्छा-तृप्ती, विश्रांती-श्रमसायास, जीवन-मृत्यू इत्यादि द्वंद्वांच्या तो पलीकडे गेलेला असतो. त्याच्या दृष्टीने हे सारे, त्याने उल्लंघन केलेले, सारखेच भ्रम असतात; मात्र असे भ्रम की ज्यांच्यापासून इतरेजन अशा बंधनात सापडतात की, ज्यातून त्यांना मुक्त करण्यासाठी तो आलेला असतो. इतरांना ईश्वरसाक्षात्काराकडे नेण्यासाठी तो प्रत्येक परिस्थितीचा उपयोग करून घेत असतो.

माणसे मेल्यावर त्यांचे अस्तित्व संपुष्टात येत नाही याचे त्याला ज्ञान असते. तो मरणाची क्षिती बाळगत नाही. नवनिर्मितीच्या आधी विध्वंस अटळ असतो, यातनांतूनच शांती व आनंद यांचा जन्म होतो, संघर्षामुळेच कर्मबंधनातून मुक्ती मिळते, हे सर्व तो जाणत असतो. तो चिंता करतो ती फक्त चिंतेविषयीच.

जे त्याच्या संपर्कात येतात त्यांच्या ठिकाणी तो असे प्रेम जागृत करतो की, ज्यामुळे त्याची सेवा करण्याच्या एकमेव इच्छेच्या ज्वालेत त्यांच्या सर्व स्वार्थी इच्छा-वासना जळून भस्मसात होतात. जे आपले जीवन त्याला समर्पण करतात, ते जाणिवेच्या द्वारा त्याच्याशी हळूहळू एकरूप होऊ लागतात. थोड्या थोड्या प्रमाणात त्यांच्यामधील मनुष्यत्व हे त्याच्या ईश्वरत्वात विलीन होत जाते व ते बंधमुक्त होतात. जे अगदी त्याच्या निकटचे असतात ते त्याचे 'आध्यात्मिक वर्तुळ' म्हणून ओळखले जातात. प्रत्येक ***सद्गुरूचे*** बारा शिष्यांचे निकटचे 'वर्तुळ' असते. ते शिष्य कार्याच्या व अधिकाराच्या बाबतीत जरी सद्गुरूपासून वेगळे असले, तरी ईश्वरसाक्षात्काराच्या बाबतीत त्यांना प्रत्यक्ष सद्गुरूच्या योग्यतेचे बनविले जाते. अवतारकालात अवताराचे एकच केंद्रबिंदू असलेल्या दहा अंतर्वर्तुळांचा व एकूण एकशे बावीस शिष्यांचा समावेश असलेले आध्यात्मिक 'वर्तुळ' असते. त्यांपैकी सर्वांना ईश्वरसाक्षात्काराचा अनुभव प्राप्त होतो व ते इतरांच्या मुक्तीसाठी कार्य करतात.

अवताराचे व त्याच्या शिष्यांचे कार्य हे केवळ समकालीन मानवजातीसाठीच नसून भावी काळासाठीही असते. सबंध ***अवतारकालीन*** युगचक्रात व्हावयाच्या जीवनाच्या व जाणिवेच्या प्रगटीकरणाचा जो आराखडा ***अवताराने*** देह धारण करण्यापूर्वी [अतिसूक्ष्म अशा] निर्मिती-जगात [बीजरूपात] तयार केला गेलेला असतो, त्याच्यावर अवताराच्या भूतलावरील आयुष्याच्या काळात कारण व स्थूल जगतांत शिक्कामोर्तब केले जाऊन तो निश्चित केला जातो.

अवतार हा त्याच्या काळातील मानवजातीला तिच्या खऱ्याखुऱ्या आध्यात्मिक स्वरूपाची जाणीव करून देतो, जे लायक आहेत त्यांना मुक्ती देतो व त्याच्या काळातील आध्यात्मिक जीवनाला गती देतो. भविष्यकाळासाठी मागे उरते ते त्याच्या दैवी स्वरूपातील मानवी आदर्शाच्या प्रेरणादायी शक्तीचे उदाहरण – वासनारहित प्रेमाचे, इतरांच्या कल्याणाशिवाय दुसऱ्या कशासाठीही न वापरलेल्या सामर्थ्याचे, आकांक्षेने न झपाटल्या गेलेल्या शांतीचे व भ्रमाने न झाकोळल्या गेलेल्या ज्ञानाचे. अखिल मानवज़ातीला दैवी जीवन जगणे शक्य असल्याचे, तसेच या भूतलावर स्वर्गीय जीवन शक्य असल्याचे प्रात्यक्षिकच तो दाखवितो. ज्यांच्या ठिकाणी आवश्यक ते धैर्य व प्रामाणिकपणा आहेत, ते त्यांच्या इच्छेला येईल तेव्हा त्याचे अनुसरण करू शकतात.

ज्यांना आध्यात्मिक जाण आहे त्यांना गेला काही काळ जाणवत असेल की, जग सध्या ***अवताराच्या*** प्रगटीकरणापूर्वी नेहमी जसा काळ असतो तशा काळातून चालले आहे. आता तर जागृत नसलेल्या स्त्री-पुरुषांनादेखील या गोष्टीची जाणीव होऊ लागली आहे. त्यांच्या [अज्ञानरूपी] अंधकाराकडून ते [ज्ञानरूपी] प्रकाशाकडे पोहोचू पहात आहेत; त्यांच्या दुःखात ते सुखसमाधानाची इच्छा करीत आहेत;ज्या कलहात आपण गुरफटून गेल्याचे त्यांना आढळून आले आहे, त्यातून ते शांतीसाठी व मुक्ततेसाठी प्रार्थना करीत आहेत.

मात्र सध्या त्यांनी धीर धरला पाहिजे. विध्वंसाची लाट आणखी अधिक उंच चढली पाहिजे, आणखी जास्त दूरवर पसरली पाहिजे. माणूस जेव्हा संपत्तीपेक्षा अधिक शाश्वत अशा कशाची तरी, तसेच भौतिक सत्तेपेक्षा अधिक सत्यस्वरूपी असलेल्या कशाची तरी अगदी बेंबीच्या देठापासून [अंतःकरणाच्या गाभ्यापासून] इच्छा धरील, तेव्हा ही लाट ओसरेल. मग शांती येईल, आनंद येईल, प्रकाश येईल.

माझा 'मौनभंग' – माझ्या सार्वत्रिक प्रगटीकरणाचे चिन्ह – फार दूर नाही. मानवाला स्वीकार करणे शक्य होईल असा सर्वाधिक मौल्यवान खजिना मी बरोबर आणलेला आहे - असा खजिना की, ज्यात इतर सर्व खजिने समाविष्ट आहेत, जो चिरकाल टिकून राहील आणि जो इतरांबरोबर विभागून घेतल्यास वृद्धिंगत होत जाईल. त्याचा स्वीकार करण्यास तयार रहा.

✤✤

---

शब्दशः भाषांतर ही अशक्य गोष्ट आहे. तरीदेखील अनुवादकांनी *'डिसकोर्सेस'* मधील मजकुराचा शब्दार्थ व भावार्थ या दोहोंशी प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न केला आहे. अनुवादकाने वेळोवेळी आपल्या पदरच्या नवीन शब्दांची भर टाकली आहे, ती चौकोनी कंसात देण्यात आली आहे. अनुवादातील संदिग्धता टाळण्यासाठी व त्यात सुबोधता आणण्यासाठी ही चौकोनातील शब्दांची भर आवश्यक आहे.